




असत्यावर प्रहार..सत्याचा...

# साप्ताहिक विजय मार्ग

संपादक : अतुल लहारे








। वर्ष १३ वे । अंक नं.२४ । पाने ४ । गुरुवार दि.२३ मे ते २९ मे २०२४ । किंमत २ रु । MAHMAR/2011/45053 । Post:NoANR-MAHMAR/040/2022-24


## सुर्यादय



दि.२३ मार्च २०२४
गुरुवार ● सूर्योदय ● सूर्यास्त
०६.०१ १९.०९

## सुविचार

कुणाच्या सांगण्यावरुन
माणसाची किंमत ठरवू नका
माणसं ओळखताना स्वतःचा
अनुभव वापरा




## दे दणका




## प्रेरणादायी



वाट पाहत राहिलो तर
इतरांनी न निवडलेलं,
शिल्लक राहिलेलं,
शिळंच ताटात पडेल, हे नक्की आहे

**– विश्वासराव नांगरे पाटील**

## मुकामार

### शोकांतिका

बुवाबाबांची किमया
दुनिया दिवानी केली,
कशी शोकांतिका झाली
भल्याभल्यांची !
अधिकारी अन् नेते
घरी तयांचेच पाय,
मग सामान्यांचे काय
सांगा तुम्ही !



लेखक : हनुमान येवले


# जिल्ह्यामध्ये निवडणूक संपताच अवैध धंदे जोमात !

## । पोलिसांचा वचक कमी झाला । निवडणूक मतदानानंतर मटका, जुगार पुन्हा जोमात ?

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।** गेल्या महिना भरापासून थंडावलेले अवैध धंदे पुन्हा सुरु झाले आहेत. लोकसभा निवडणुक काळामध्ये पोलिसांनी मटका, जुगार, हातभट्टी दारुचे अड्डे, अवैध दारु विक्री, गांजा विक्री करणाऱ्या संशयितांवर कारवाईचा धडका लावला होता. मध्यंतरीच्या काळात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकांनी मोठी कामगिरी केली होती. यामूळे निवडणुक काळात थंडावलेले धंदे आता पुन्हा जोमाने सुरु झाले असल्याचे चित्र विविध भागात पाहावयास मिळत आहे.

पोलिसांच्या कारवाईमुळे अवैध धंद्यावर काही कालावधीसाठी निश्चितच जरब बसल्याचे पाहिला मिळाले. परंतु लोकसभां निवडणुकांचे मतदान संपल्यावर पुन्हा जैसे थे अशी परस्थिती पाहिला मिळत आहे. यामधुन नेमकी ही परिस्थिती का निर्माण होते व याला जबाबदार कोण असाच प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. काही कालावधीत थंडावलेले व्यवसाय सुरु झाल्याचे पोलिसांना मात्र ते दिसत नाही का?

निवडणूक प्रक्रियेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता निवडणुक काळात अवैध धंद्यांवर पोलिसांकडून कारवाया केल्या जातात. सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळून त्यांना हद्दपार केले जाते. पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगारांकडून चांगल्या



वर्तनाचे प्रतिज्ञापत्र लिहून घेतले जाते. गेल्या दिड ते दोन महिन्यात पोलिसांनी सराईत गुन्हेगारांसह सुमारे दिड हजार संशयितांवर कारवाई केल्याचे दिसते. निवडणुकीच्या काळात सर्व काही अलबेल होते असेच म्हणावे लागेल. परंतु जसे निवडणुकीचे मतदान झाले तसे अवैध धंद्याना पुन्हा तेजी आल्याचे पाहिला मिळत आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस धडाकेबाज कारवाई करत असतील तर पुन्हा पुन्हा तेच व्यवसाय सुरु का होतात. तसेच जे व्यवसाय सुरु होतात त्या वेळी त्या हद्दीमधील पोलिस अधिकारी नेमकी कोणती भुमीका बजावतात? एकंदरीत स्थानिक गुन्हे शाखेचे पथके आपले काम जोमात करत असले तरी ज्या –ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे सुरु आहेत हे माहित असताना तेथील स्थानिक पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी अगोदरच कारवाई का करत नाहीत असा प्रश्न निर्माण होतो. पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंदे आणि ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी यांचे काही सबंध आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### स्थानिक अधिकाऱ्यांची बघ्याची भुमिका ?

▶ शहरासह जिल्हयात स्थानिक गुन्हे शाखेचे पथके जोरदार धाडसत्र राबवून अनेक ठिकाणी अवैध धंद्यावर कारवाई कारुन पोलिसांची जरब बसवण्याचा प्रयत्न करतात. मटका, जुगार, दारु आदी व्यवसायवर धाडी टाकुन ते बंद करण्याचा प्रयत्न करतात मात्र स्थानिक पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी कारवाई का करत नाही व त्यांची अवैध धंद्याकडे बघ्याची भूमिका नेमकी कशासाठी हे सर्वसामान्यांना चांगलेच ज्ञात आहे.

### गोपनिय तक्रारींची दखल घ्यावी

▶ पोलिस हा जनतेचा मित्र आहे. कोणतीही मनात भीती न बाळागता अवैध धंद्याविषयी नागरीकांनी पोलिसांशी संपर्क साधवा असे आवाहन पोलिस प्रशासन माध्यमांमधून करत असते. याबाबतही काही गोपनीय तक्रारीही पोलिसांना प्राप्त होतात मात्र, याची पोलिस दखल घेत नाहीत अशा तक्रारी नागरीक वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे केल्या करत असतात.हे पाहता स्थानिक स्तरावरच गोपनिय तक्रारींबाबत कारवाई होणे गरजेचे आहे.

## १४ मे ला मानवंदना : माउंट मेरा शिखरावर स्मिताने फडकवला तिरंगा

**। धनकवडी । प्रतिनिधी ।** शिवछत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज म्हणजे प्रत्येक मराठमोळ्या माणसांचं प्रेरणास्थान, शिछत्रपतीच्या विचारांपासून गिर्यारहक क्षेत्रात काम करणाऱ्या स्मिता दुर्गादास घुगे हिने सुमारे ६ हजार २०० मीटर उंचीवर असलेल्या नेपाळच्या माउंट मेरा शिखरावर तिरंगा फडकवत छत्रपती संभाजी महाराजांना जयंतीदिनी (दि.१४ मे ) रोजी मानवंदना दिली.

अत्यंत प्रतिकूल वातावरणात कठीण चढाई करताना मनात सदैव छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज धरधगती प्रेरणा आत्मविश्वास देत असल्याचे स्मिता यांनी सांगितले आहे. गिर्यारोहनाचा कोणताही वारसा नसतानाही धनकवडी येथील स्मिताने ७ खंडांमधील ७ उंच शिखर सर करण्याचे स्पप्न आहे. त्यासाठी ती अहोरात्र मेहनत घेत आहे. या दृष्टीने मार्गक्रमण सुरु असून, या आधी स्मिताने अफ्रिका खंडातील सगळ्यांत उंच शिखर माउंट किलीमांजारो सर करुन ७५ फुट तिरंगा ध्वज फडकवित इतिहास घडविला होता.



## प्री–वेडिंग,बॅचलर पार्टी जैन प्रथांविरुध्द

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।** आजकाल काही लोक प्री – वेडिंग, बॅचलर पार्टी, बेबी शॉवर, पूल पार्टी, कार्निव्हल आदी जैन प्रथांविरुध्द अशोभनीय कार्यक्रम आयोजित करुन जैन विधींचे मोठे नुकसान करत असल्याबद्दल पन्यास राजरक्षितविजयजी यांनी कोल्हापूरात एका कार्यक्रम प्रसंगी केले.

श्री संभवनाथ जैन ट्रस्ट गुजरी यांच्या प्रांगणात कोल्हापूर जैन संघाचे विश्वस्त व विविध तरुण मंडळांनी शासन स्थापना दिन साजरा केला. युगप्रधान आचार्य सम पन्यास प्रवरा श्री चंद्रशेखर विजयजी, पन्यास राजरक्षितविजयजी, पन्यास नैरक्षितविजयजी यांचे शिष्य अरहम समूहातील युवकांनी पवित्र विसाव्यात शासकीय ध्वज घेऊन मिरवणूक काढली. गुजरी, शाहपूरी, लक्ष्मीपुरी, भक्तीपूजा, प्रतिभानगर, शत्रुंजय सोसायटी आदी युनियनच्या विश्वस्तांनी ध्वजारोहण केले. संवत्सरी उत्सवापेक्षा आजचा दिवस मोठा असल्याचे पंडित राजरक्षितविजयजी यांनी उपस्थितांना सांगितले.

## जनजागृतीसाठी संपूर्ण प्रशासन ‘झटले‘ तरीही जिल्ह्यात मतदानाचा टक्के ‘घटले‘!

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।** नगर आणि शिर्डी मतदारसंघात प्रशासनाने विविध उपाय योजना राबवत जनजागृतीसाठी प्रयत्न केले व त्यावर मोठ्या प्रमाणात आर्थिक खर्चही केला. परंतु नगर जिल्हयात सरासरी ६६ टक्के मतदन झाले आहे. जनजागृतीसाठी प्रशासन तब्बल दिड ते दोन महिने प्रयत्न करत होते. जनजागृती करुनही टक्केवारीत म्हणावी अशी वाढ न झाल्यने यामध्ये नेमके काय चुकले, याकडे प्रशानाने लक्ष देवून भविष्यात जनजागृती करण्याची गरज आहे.

मतदनाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनाने मोठे कष्ट घेतले. महानगरपालिका, जिल्हा परिषद आदींसह विविध विभागांनी मतदानाचा टक्का कसा वाढविता येईल यासाठी प्रबोधन केले. परंतु याला म्हणावे असे यश आलेले दिसत नाही. जिल्हयात मतोत्सवात यंदाही म्हणावा असा उत्साह दिसला नाही. मतदान करताना येणाऱ्या विविध अडचणी आणि त्यातच वाढलेला उष्णतेचा पारा पाहता यंदा अहमदनगर साठी सरासरी ६६ टक्के तर तर शिर्डीसाठी ६३ टक्के एवढे मतदान झाले आहे. यामध्ये पाहिले तर अहमदनगरमध्ये सरासरी ३४ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला नाही. तर शिर्डीसाठी ३७ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला नाही. एकंदरीत लोकशाहीमध्ये सर्वांना मताचा अधिकारी असताना त्यांनी याकडे दुर्लक्ष का केले असा देखील प्रश्न निर्माण होतो.

भविष्यात प्रशासनाने घटलेल्या टक्क्याविषयी चर्चा करण्यापेक्षा जनतेमध्ये वेगवेगळ्या विषयांवर प्रबोधन करण्याची गरज आहे. अनेकदा मतदान आमिषाला बळी पडतात असे बोलले जाते. यासाठी प्रशासनाने टक्का वाढविण्यासाठी अशा गोष्टीना पायबंद घालण्यासाठी प्रबोधन करणे भविष्यातील गरजेचे आहे.

## डाक कर्मचाऱ्यांना सुरक्षेवर मार्गदर्शन

**। यवतमाळ । प्रतिनिधी ।** पोस्टमन आणि ग्रामिण डाक सेवक यांच्याकरिता उन्हाळ्यात आरोग्याची काळजी कशी घ्यावी यावर मार्गदर्शन कार्यक्रम येथील मुख्य डाकघरात घेण्यात आला. डाक विभाग यवतमाळ सामका आयुर्वेद हॉस्पिटल व रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमान हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये वैद्य पंकज पवार यांनी मार्गदर्शन केले.



याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डाकघर अधीक्षक गजेंद्र जाधव उपस्थित होते. निनावे, मून यांनी प्रस्ताविक व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुष्ट देऊन करण्यात आले. या कार्यक्रमाला डाक विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

## ‘ड्रकं अँन्ड ड्राईव्ह’ची नावापुरतीच कारवाई !

**। पुणे । प्रतिनिधी ।** गेल्या काही वर्षांपासून पुण्यामध्ये पब संस्कृती ही फोफावत चालली आहे. त्यात भर म्हणजे पुण्यामधील पब आणि रेस्टॉरंट रात्री मध्यरात्रीपुढे सुरु असतात. रेस्टॉरंटच्या परिसरात पोलिसांकडून ‘ड्रंक अँन्ड ड्राईव्ह’ ची कारवाई ही नावापुरतीच असल्याचे अनेकांनी म्हंटले आहे.

‘ड्रंक अँन्ड ड्राईव्ह’ ची कारवाई ही मुळातच कधी आणि केंव्हा होते ही कुणालाच माहिती नाही. पुण्यामध्ये सरासरी वर्षभरात साडेतीनशे मद्यपी वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असल्याचे समजते. मद्यपी वाहन चालकांवरील पोलिसांच कारवाई ही एक प्रकारे दिखावा असल्याचे समोर येत आहे. गेल्या काही वर्षापासून या कायद्याचा धाक निर्माण करण्यात पोलिसांनी सपशेल अपयश आले की काय असाच काहीसा प्रश्न महागड्या गाडीच्या आपघातानंतर पडला आहे.



▶ सावेडीतील श्री आयप्पा मंदिराचा ३० वा प्रतीस्थापना महोत्सव (वर्धापनदिन) तीन दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार्याच्या उपस्थिती करण्यात आले होते.

## महावितरणच्या ठेकेदारांचे अनेक अजब गजब प्रकार

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।** शहरातील अनेक ठिकाणी महावितरण कंपनीने रिडींग अथवा बिल वाटपासाठी ठेकेदाराची नियुक्ती केली आहे. परंतु अनेक भागामध्ये नेमके ह्या ठेकेदाराचे माणसे कधी येतात आणि कधी नाही याचा कोणालाही ठाणपत्ता लागत नाही. यामधून नागरीकांना मोठा मनस्ताप होत आहे. अनेकांना अवाजवी बिले मिळत असून या बिलांनी नागरीकांना सध्याच्या भीषण उन्हाळ्यात जास्तीचा घाम फोडला आहे.

नगर शहरामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून महाविरण कंपनीचे ठेकेदार यांनी आपल्या हाताखाली काही कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. परंतु हे कर्मचारी नेमके काय काम करतात आणि काय नाही याचा पत्ता ठेकेदाराला नाही. वास्वविक पाहता ठेकेदार नेमके कोणत्या पध्दीने काम करतोय याची खबरदारी येथील महावितरणच्या अधिकाऱ्यानी घेणे गरजचे आहे. परंतु त्यांना या गोष्टीचे काही देणे घेणे नसल्यासारखे ते वागत असून नागरीक आता महावितरण कार्यालयावर आंदोलन करण्याच्या तयारीत आहे.

# आयुक्त साहेब ॲनिलम वेस्ट टाकणाऱ्यांकडे लक्ष द्या!

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।** आपले शहर सुंदर शहर आणि सुंदर शहर आपले शहर अशी टिमकी नगर महानगरपालिका वाजवित असली तरी आज शहरात ठिकठिकाणी टाकल्या जाणाऱ्या ॲनिमल वेस्टमुळे मोकाट कुत्र्याचा त्रास नागरीकांना भोगावा लागत आहे. यावर आता आयुक्त साहेबांनी ॲनिमल



ॲनिलम वेस्ट रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला टाकल्याने अनेक ठिकाणी कुत्र्यांची झुंडीच्या झुंडी पाहिला मिळतात. अनेकदा हे झुंडी वाहन चालविणाऱ्या व्यक्तीच्या पाठी लागतात. यातुन अनेकदा छोटे मोठे अपघात झाल्याचे पाहिला मिळाले आहे. परंतु यावर कोणीही आवात उठवत नाही. राजकीय शहराच्या परस्थितीत काहीसा बदल होण्याची चिन्हे आहेत.

शहरातील काही ठिकाणी ॲनिमल वेस्ट हे नदी–नाल्यात व ओढ्यात, रस्त्याच्या कडेला टाकलेले दिसून येते. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते मनपा प्रशासनाने मनुष्यबळ अपुर्ततेची कारणे न देता ॲनिमल वेस्ट संदर्भात गांभिर्याने लक्ष देण्याची

### »» हॉटेल व्यवसायिक, मांस विक्रेते, हॉटेल व्यवसायिकांसाठी नियम करा

वेस्ट टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे. ॲनिमल वेस्टच्या पायबंदासाठी मनपा आयुक्त कोणती ठोस पाऊले उचणार हे त्यांनी जाहीर करावे अशी मागणी नागरीकांमधून होत आहे.

ॲनिमल वेस्टमुळे शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या वाढण्यास मदत होत आहे. ॲनमल वेस्ट रस्त्यालगत टाकल्याने रस्त्यांवर मोकाट जनावरांमुळे अपघाताच्या घटना घडत आहे. शहरातील मटन शॉप, चायनीज दुकाने, हॉटेल व्यवसायिक, मास विक्रेत्यांचे सर्वेक्षण करुन माहिती घेवून अशा व्यवसायीकांना त्यांचे ॲनिमल वेस्ट टाकण्यासाठी स्वंतत्र व्यवस्था करण्याची गरज आहे. यातून नगरकरांना निश्चित दिलासा मिळेल यात शंका नाही.

इच्छाशक्ती असलेल्यांना या विरोधात बोलता येत नाही अशी कहाणी आहे. परंतु आता मनपा प्रशासनात राजकीय वरदहस्त कुणाचाही नसल्याने आयुक्त साहेबांनी शहरातील अशा गोष्टींना लगाम घातल्यास गरज आहे. अन्यथा नेहमीप्रमाणे मोकाट कुत्र्याच्या बंदोबस्तासाठी मनपा वर्षाकाठी लाखो रुपये खर्च करते तरीही कुत्रे तेवढेच! ही बाब आयुक्तांनी लक्षात घेवून ॲनिमल वेस्ट बाबत लक्ष देण्याची गरज आहे.